परिपत्रक क्र. १४

उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण, द्विलक्षी अभ्यासक्रम
व पूर्व प्राथमिक तांत्रिक विभागाकडील
वरिष्ठवेतनश्रेणी धारक शिक्षकांची यादी

# रयत शिक्षण संस्था,सातारा.

कर्मवीर समाधी परिसर,सातारा
उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये
दिनांक ०९/०९/२०२१
परिपत्रक क्र. १४

प्रती,
सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण/ पूर्व प्राथमिक तांत्रिक विभाग
रयत शिक्षण संस्था

विषय – निवडश्रेणीसाठी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेल्या उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभाग / द्विलक्षी विभागाकडील शिक्षक / शिक्षक (प्रात्य.), व पूर्व प्राथमिक तांत्रिक विभागा कडील सहाय्यक अधिव्याख्याता व निदेशकांच्या सेवाज्येष्ठता यादी मधील त्रुटी व दुरुस्त्यांबाबत.

संदर्भ - संस्थेकडील क्र. ५८ दि. २९/०१/२०२० चे परिपत्रक .

वरील विषयान्वये आपणास कळविणेत येते की, उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण / द्विलक्षी विभागाकडील वरिष्ठवेतनश्रेणी धारक शिक्षक / शिक्षक (प्रात्य.), व पूर्व प्राथमिक तांत्रिक विभागाकडील सहाय्यक अधिव्याख्याता व निदेशक यांना निवडश्रेणी पात्रतेसाठी वरील संदर्भीय परिपत्रकाने सेवा ज्येष्ठता यादी तयार करणेकामी शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांची मागणी केली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या कागदपत्रांची छाननी करून योग्यत्या दुरुस्त्यांसह अद्ययावत यादी तयार करून सेवकांच्या आवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

तथापि काही सेवकांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा उत्तीर्ण दिनांक नमूद न करता फक्त उत्तीर्ण वर्ष नमूद केलेले आहे अशा सेवकांनी व सदर यादी मध्ये अद्याप देखिल काही सेवकांच्या माहिती मध्ये दुरुस्ती असलेल्या सेवकांनी शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांची साक्षांकित प्रत इमेल द्वारे संस्थेच्या junior@rayatshikshan.edu या इमेल वर दि. २३/०९/२०२१ पर्यंत शाखाप्रमुखांमार्फत शिफारशीसह पाठवावी. दि. २३/०९/२०२१ पर्यंत कोणतीही दुरुस्ती न आल्यास शासन नियमानुसार निवडश्रेणीचे निकष पूर्ण करणा-या पात्र सेवकांना निवडश्रेणी मंजुरीची कार्यवाही केली जाईल. तसेच नमूद दिनांकानंतर आलेल्या कोणत्याही दुरुस्त्या अथवा सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

शाखाप्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून ते वाचलेबाबत स्वाक्षरी घेउन त्याची एक प्रत शाखेच्या दप्तरी ठेउन एकप्रत या कार्यालयाकडे इमेलद्वारे पाठवावी

सहसचिव(उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था,सातारा.

प्रत माहितीसाठी

१. सचिव, रयत शिक्षण संस्था,सातारा.
२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था,सातारा
३. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था.
४. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.